# संतटाहो.



म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २१८१

REFBK-0020047
REFBK-0020047

## संत भोजराज:

काव्य
२९८१
२००८६
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. २००८६
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वागत
अनुक्रम २००४५० वि: काव्य
क्रमांक २९८१ नोंद दि. २३।९९
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२००४५०
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

# संत टाहो

कविता संग्रह

REFBK-0020047
REFBK-0020047

संत भोंजराज

प्रथमावृत्ती १९७३

किंमत दोन रुपये

प्रकाशिका :

**सौ. विमल भागवत राणे**

" अशोक प्रकाशन "

सावदा, जिल्हा. जळगाव.

* *

मुखपृष्ठ चित्रकार :

**न. द. सपकाळे**

जी. डी. आर्ट, ए. एम्-

---

अनुवाद, नृत्यीकरण, ध्वनीमुद्रण, नभोवाणी,
वितरण आदि हक्क कवीचे स्वाधीन

---

* *

मुद्रक :

**अनिल चौधरी**

अनिल प्रिंटर्स, फैजपूर

जिल्हा जळगाव

# अर्पण पत्रिका

भारतात सर्वाभूति देव आहे. तत्वज्ञान ज्यांना मान्य आहे. ते परमेश्वर माती, पाषाण, लाकूड, धातू, पशू, पक्षी, मानवांत देव आहे असे समजून हजारों मार्गानो देवाला भजतात. देव हा दाता आहे. देव ही भावना आहे देव हा मंदीरात आहे. देव हा सत्ता संपत्तीत आहे. देव हा भटजीचे पोथीत आहे. देव हा पंढरपुर, मक्केत आहे. देव भगवत्‌गीतां, कुराण, पुराण, बायबल मध्ये आहे ह्याचा सरळअर्थ देव रुढी नांवाचे धर्मांत आहे. संत भोजराजांचा ज्ञानबोधाचा काळ सन १९३० पासून सुरूं होतो. पांडुरंगाचे कृपेची छाया १९४० पासून सुरु होते. देव बघायचा झाला तर संतांचे सहवासा शिवाय देव दिसत नसतो. अनुभव अनुभूतीलाच संत भोजराज वाहन म्हणतात. वाहनाने गतो, वेग मिळतो. आदर्श संसार, सुखाचा संसार देवामुळंच होतो. चाळीस वर्षांचा सुखाचा संसार. चौतीस वर्षांतील पोलिस-खात्यांतील नौकरीतून केलेली जनसेवा देवाचे सान्निध्य मानतात. आपले हातून पन्नास पुस्तके लिहीली गेली. हा गुरुप्रसाद भाग समजतात. देवाचे सगुण, निर्गूण रुपांतून प्रेम, भक्तीची गंगा अव्याहत हृदय, मन, बुद्धितून वहानांना भारतवासियांच्या हृदयाला स्पर्शकरित जेव्हा पांडुरंगाचे भेटीला जाते. शद्बांचेच पत्र, पुष्प, फळांनी कवटाळीते ह्या नवविधा प्रकारालाच संत भोजराज साहित्य म्हणतात संत परंपरा समजतात. ह्या पुरुषाला धर्गी पुरुष मानतात. स्थितप्रज्ञ अवस्था हीच होय. मायेपासून लांब, विषमता भेदाभदापासून अलिप्त असा हा मनुष्य कोटीतील संत शिरोमणी ठरत असला तरी राजस, तामस वृत्तीचे लोकांचे गळचातील ताईत ठरतो असं म्हणता येत नाहीं सरकार धार्जिणे लोक ह्याला ओळखतात. असं म्हणणं बरोबर नाही कोटीं संत ह्या पुरुषाला मान्यता देतात नमस्कार करितात. लिखाण भाषणात मंत्रमुग्ध होतात हे सत्य लपवीता येत नाहीं

भारतांत किती भाषा आहेत. प्रांत आहेत. जाती आहेत. धर्म आहेत. वर्ग आहेत. ह्या अभ्यासापेक्षां कष्टावर श्रद्धा ठेवून उत्पादन वाढवून, वाटप पद्धतीला मान्यता देऊन स्थीर सरकारचे हात बळकट करणे. जगाच्या कल्याणासाठीचं देवाला आळविणे. ही जे दैनंदिनी स्वीकारतात तोच आधूनिक संत, धर्म संत भोजराज मानतात. संताबद्दल असंत, अभक्त, बोलत नसतात. असहकार पुकारतात. संत भोजराजांना संत असंतातील फरक कळला म्हणूनच ते संत बनलें. आणि त्यांनी भारतातील पंचावन्न कोटी संतांना आपुली नम्रता वाहिली. देवाला तन मन वाहिले. श्रमिक संतांचे चरणी आपुला कविता संग्रह " संत टाहो " अर्पण करितांना स्वतःला धन्य समजतात.

संतदास

**संत भोजराज**

# :– प्रकाशकाचे दोन शब्द –:

संत भोजराज हे भारतांतील महान् संत शिरोमणी आहेत. देवाची कृपा लाखो संतांचे आशिर्वादाने ते संत बनले आहेत. संत भोजराजानी आतापावेतो पन्नास पुस्तके लिहीली आहेत. आतां संत भोजराजांनी सत्तावन्न वर्षांत पदार्पण केले आहे. संत भोजराज हे पन्नास पुस्तकें लिहणारे भारतातील पहिले पोलीस ऑफिसर आहेत. संत भोजरांजांनी साहित्याचा मराठी, हिन्दी, उर्दू, इंग्रजी, संस्कृत, गुजराथी भाषेतून अभ्यास केला आहे. मराठी हिंदी उर्दू भाषेतून लिखाण केले आहे. भारतात तीन तऱ्हेचे लेखक आढळतात.

सात्विक, राजस, तामस
धर्मी, निधर्मी, अधर्मी
ज्ञानी, विज्ञानी, अज्ञानी
संत, भटजी, शेटजी

संत भोजराज सात्विक, धर्मी, ज्ञानी, संत आहेत. हरिभक्त, देशभक्त समाज सुधारक आहेत. धार्मिक, राजकीय, सामाजीक सुधारणे बरती लिखाण करितात. संत भोजराज श्रमिक आहेत. गरिबांचे करिता गरिबी जीवन जगतात. भारतात पंचावन्न कोटी संत राहतात. हाच त्यांचा साहित्याचा उच्च हेतू आहे. संत भोजराज राजस म्हणजे भटजी, तामस म्हणजे शेटजी असे समजून टीका करितात. टीकेचा अर्थ सर्वांनी संत बनावं हाच आहे. कोणतेही सरकार हे राजस वृत्ती चेच असते. सरकारने पण संत बनावें धर्माप्रमाणे वागावें असेच संत भोजराजांना वाटतं कलेक्टर, मिनिस्टर, आचार्य, प्राचार्य, श्रीमंत सावकार, राजकारणी, धोरणी, सत्ताधारी, संपत्तीधारी गर्विष्ट लोक संत भोजराजाकडे ढुंकुन बघत नसतात. संत भोजराज हा धर्माचा जय निर्धमाचा पराभव समजतात. संत भोजराज

राजपक्ष, धर्मपंथ, विषमता, भेदाभेद पासून अलिप्त आहेत. संत भोजराज वाद विवाद, वितडवाद घालीत नसतात. संत भोजराज गुरुपरंपरा, राजपरंपरा मानीत नाही. त्यांचा कुणी गुरु नाहीं. शिष्य पण रहाणार नाहीं. सत्कार समारंभ, मानपान, त्यानां ठाऊक नाहीं संत भोजराज गरिब आहेत. त्यामुळें ते कोणतेही दान करू शकत नाहीं. ज्ञानदान मात्र ते विना मुल्य करितात. आदर्श संसारी ठरत असल्यामुळं लाखो संतांशी त्यांचा ऋणानुबंध संबंध आलेला आहे.

आनंदी आनंद गडे
जिकडे तिकडे चोहिकडे ॥

त्यांचे जीवनांत आनंद पूरून उरलेला आहे. भारताचे भले, भारतवासियांचे भले व्हावें अहर्निश प्रभूला प्रार्थना करितात. भारताचे भले संतच करतील ह्यावरच त्यांची दृढ श्रद्धा आहे. भारत प्रगति पथावर आहे. राजस तामसांचे गर्वोक्तीयुक्त लिखाण संत भोजराज वाचित नसतात. भाषण ऐकत नसतात. भारतात कोण राजस तामस रांजकीय पुढारी आहेत. संत भोजराज देशभक्तांना हरिभक्त मानीत नसतात. हरिभक्त व्हायचं झाल तर त्याला संतच बनाव लागेल जो हरिभक्त आहे. त्याला देशभक्त, समाज सुधारकतेची परिक्षा द्यावयाच कांही कारण नाही . राजस तामसवृत्तीचे सरकारवर सरकारधार्जिणे रावण, कंस, कौरवांचे वंशजांचेवर संत भोजराज कडाडून हल्ला करितात. त्यांचा इतिहास जमा करणे नामशेष करणं हाच धर्माचा भाग समजतात. संत साहित्याचा जय मानतात.

संत भोजराज निर्व्यसनी आहेत. काटकसरी आहेत. सामान्यतील असामान्यत्वाकडे त्यांची झेप आहे. संत भोजराज रात्रंदिवस कष्ट करितात कष्टाचचं खातात. पोटा साठीचं वणवण भटकतात. पुस्तक विक्री हेच त्याच पोट भरण्याचं साधन आहे.

राजस, तामस, असंत, अभक्त, सत्ताधारी पदवीधर त्यांची चूक काढण्यांत धन्यता मानतात संत भोजराज आपण राजस, तामस नाहीं हेंच

जगाला दाखवू ईच्छीतात. संत भोजराज मायेतून मुक्त आहेत. सर्वांचेच भले व्हावे सर्वांचेच सुखात आपले सुख समावलेले आहे. असच संत भोजराज समजतात.

संत भोजराज धर्माचा, संत परंपरेचा, संत साहित्याचाच प्रचार करितात. त्यांची पूस्तकें वाचल्याशिवाय त्यांची थोरवी कळणार नाहीं त्यांचे बद्दल आदर वाढणार नाहीं. अशोक प्रकाशन सावदा मार्फत "संत टाहो" हा भोजराजांचा कविता संग्रह नुकताच प्रकाशित झाला आहे. रसिक वाचकांचे हातांत पुस्तक देतांना आम्हाला आनंद होत आहे.

**अशोक प्रकाशन, सावदा**
जिल्हा :– जळगांव

★ ★ ★

## अनुक्रमणिका


१ राजस तामस समज
२ आम्ही गरीब आहोत
३ हे त्रिभूवनके छय्या !
४ देवा तूं
५ भारती तेची थोर
६ गळुनी जातसे धर्म
७ मंबाजी तुकाराम बनले
८ ह्या विठ्ठलाचा आकार
९ आईसारखे दैवत नाही
१० जातियतेची करामत सारी
११ कसे ओळखावे
१२ आमुचे जीवनात
१३ देवानेच केले भले
१४ विठ्ठलाची परंपरा
१५ संत अमर जहाले
१६ रामाला शरण जातात
१७ प्रतिभा आटली
१८ धरले तर चावते
१९ दुःखाचा भार वाहीला
२० पांडुरंगाला जरुरत संतांची
२१ आम्ही कोण ?
२२ मी मित्र म्हणून
२३ प्रयोगच फसला
२४ बापूजी अमर है
२५ विठ्ठलच साक्षीदार
२६ विठ्ठलच उरला
२७ विठ्ठल ! बिठ्ठल ! चराचरी
२८ होते राजस तामस
२९ अढळपद लाभले
३० वाघ सिंह अहिंसक
३१ ज्ञानियांची नजर
३२ वाघ गुरगुरला
३३ संतांना प्रसाद वाटला
३४ अरींग मीरींग
३५ जन हो ! संत बना !
३६ आजचा मानव पुढारला
३७ याद आजि न आयी
३८ पनघटको चली पनिहारी
३९ जिबनाचा बाजार
४० प्रभूके साथ
४१ प्रभू भजनातच दंगले !
४२ देहाला लोळवा
४३ दाह शांत झाला
४४ निराश कां होता ?
४५ भगवंतच उभा राही
४६ देव कळला नाही
४७ साहेब म्हटल्यावर
४८ प्रयोग छान !
४९ राजस बडा कडू कारले
५० जाहीर करावा
५१ टंचाई
५२ संतांची कृपा झाली
५३ धर्म
५४ गोकुळीचा कृष्ण
५५ कृपा झाली
५६ देवाचे बोलावणे
५७ ज्ञानदेव तुकारामाचा
५८ साहित्य सम्राट
५९ किंचित कवि
६० खुद पसंत

# १ राजस तामस समज

आम्हाला दोन तोंडे एक उघडता दुसरे बंद योजना असते ॥
भारताला धोका एक बोलते भारताला धोका नाही दुसरे ओरडते ॥१॥

आम्हाला दोन तोंडे एक उघडता दुसरे बंद योजना असते ॥
भारतात सुकाळ एक बोलते टंचाई आहे दुसरे ओरडते ॥ २ ॥

आम्हाला दोन तोंडे एक उघडता दुसरे बंद योजना असते ॥
भारताची गरिबी हटवा एक बोलते श्रीमंत राहू द्या दुसरे ओरडते॥३॥

आम्हाला दोन तोंडे एक उघडता दुसरे बंद योजना असते ॥
भारताची प्रगति खुंटली एक बोलते प्रगति चालू दुसरे ओरडते ॥४॥

संत भोजराज वदति सरकार हे आहे दुतोंडी सावज ॥
गाईचे पालन घोषणा आज वाघाचे रक्षण दुसरी समज ॥ ५ ॥

## २ आम्ही गरीब आहोत

आम्ही गरीब आहोत आमुचे जवळ पैसा नाही ॥
मूर्खांनो ! पैसा नको ज्ञानाचीच जरूरत राहीं ॥ १ ॥

आम्ही अडाणी आहोत आमुचे जवळ पदवी नाही ॥
मूर्खांनो ! पदवी नको ! कर्तव्य कर्मांची जाणीव पाही ॥ २ ॥

आम्ही अल्प संख्यांक आम्हाला नौकरीच नाही ॥
मूर्खांनो ! कष्ट करा ! बेकारीच रहाणार नाही ॥ ३ ॥

आम्ही हरिजन आहोत उच्चवर्णीय जवळ घेत नाही ॥
मूर्खांनो ! संत बना ! कसलीच उणीव भासणार नाही ॥ ४ ॥

संत भोजराज वदति आळशी, मूर्ख नेहमीच रडतात ॥
निधर्मी सर्वदा सरकारलाच दोषी ठरवितात ॥ ५ ॥

# ३ हे त्रिभूवन के छय्या !

हे त्रिभुवन के छय्या ! निराकारी जब बन जाते अवतारी ॥
यमुना के नींरतीर बन्सी बजावत कहलाते मुकुंद मुरारी ॥ १ ॥

झनन् झाँज बजत छून छून पैंजण नाद घुमत ॥
गोप गोपिका फेर धरित नाच में गुजर गयी रात ॥ २ ॥

दुखियोंके तुम पालनहार भक्तोंके बडे सरदार ॥
जहाँ देखो वहाँ क्षेंत्रमें कृष्ण नामकी पुकार ॥ ३ ॥

आप हो ! अनाथके नाथ दुर्जनपर उठाते हाथ ॥
कौरव-पांडव धर्मयुद्धमें धर्मराजको दिया साथ ॥ ४ ॥

संत भोजराज को सुबह शाम लगी कृष्ण नामकी धून ॥
राधा मोहनके कृपासे हमेशा गाते संतोंके गून ॥ ५ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थ
अनुक्रम 20084 दि:
२१८१

# ४ देवा तूं

देवा ! तू असून नसून निरूपयोगी उपयोगी राही ॥
दिवा भीतासाठी अंधार डोळसांना आधार राही ॥ १ ॥

देवा ! तू असून नसून निरूपयोगी उपयोगी राही ॥
मुक्यासाठो ईषारे ऐकणारांचा तू वेदच पाही ॥ २ ॥

देवा ! तू असून नसून निरुपयोगो उपयोगी राही ॥
वेडयासाठी दगड मूर्ति संतांचा तू दास होई ॥ ३ ॥

देवा ! तू असून नसून निरूपयोगी उपयोगी राही ॥
नास्तीकासाठी भोगानंद आस्तीकांचा ज्ञानानंद पाही ॥ ४ ॥

संत भोजराज जगी धन्य बाळपणीच देव ओळखला ॥
रात्रंदिवस हरिभजन करितां जीवनांत प्रकाश पडला ॥ ५ ॥

# ५ भारती तेची थोर

भारती तेची थोर ज्यांनी ज्ञान ज्योतीने जाळली कर्मे ॥
तेची जाणती धर्म जे कायावाचा मने जगती धर्माने ॥ १ ॥

धर्म तोची जाणावा जो निधर्म ओळखत नाही ॥
शेटजीचा देह भटजींचा आत्मा समजा गीताई ॥ २ ॥

कष्टावर ज्यांची श्रद्धा नाही त्यांना वदावे भटजी ॥
राजकारणाशिवाय ज्यांना झोप नाही समजा शेटजी ॥ ३ ॥

अरेरे ! पंचावन कोटी संत शेटजींनी रावविले ॥
श्रमिक सामान्यांची केली दिशाभूल भटजींनी फसविले ॥ ४ ॥

संत भोजराज वदति आज दिवस सासूचा उद्या सुनेचा ॥
काळाचा महिमा थोर भारत नित्यच धर्मी संतांचा ॥ ५ ॥





मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. २००४६

## ६ गळुनी जातसे धर्म

गळुनी जातसे धर्म जेव्हा वाढते राजकारण ॥
तेव्हां देव घेतो अवतार भारताचे बघुनी वातावरण ॥ १ ॥

तुकारामानंतर श्रमिकांना भटजींनी दाखविला निधर्म ॥
शेटजींनी दिली साथ सत्ता संपत्ती हेच ध्येयमर्म ॥ २ ॥

ज्ञानाचे सासर विज्ञान अज्ञानाचे बनविले अंधार घर ॥
अंध अंधारी बैसविले लिखाणाचे केले हत्यार ॥ ३ ॥

शेटजीराज्य प्रचार केला भटजींना सरकारची साथ ॥
मायावी विसरले देव भारतात शंभर कोटी संतांचे हात ॥ ४ ॥

संत भोजराज विनविती संतांनो नित्यच काम करा ॥
भारताचे प्रगतिसाठी भजा रुक्मादेवीवरा ॥ ५ ॥



# ७ मंबाजी तुकाराम बनले

भारतात भटजी विधवा शेटजी सधवेने काय केले ॥
संत भोजराजांचे कीर्ति सूर्याला टोंपलीने झांकले ॥ १ ॥

रेडिओला गोदरेज कुलूप लाविले वर्तमानपत्र पेटित ठेविले ॥
व्यासपीठाभोवती भट नेमिले संताबद्दल बोलणेच बंद केले ॥ २ ॥

संत भोजराजांचा पराभव व्हावा ! सर्वांनी तप सुरू केले ॥
भोजराज धर्मराजच समजून जयाकरिता युद्ध पुकारले ॥ ३ ॥

शेवटी श्रीकृष्ण धावला सूर्य उगवायचा तो उगवला ॥
शेटजी भटजी प्रत्येकजण धर्मयुद्धात स्वर्गी गेला ॥ ४ ॥

निधर्म, अधर्मांचे छाताडावर संत नाचू लागला ॥
भारतात संतांचा जयजयकार धर्म प्रभावी ठरला ॥ ५ ॥

असंतांचे विज्ञान अज्ञानाचा शेवटी फुगा फुटला ॥
संतांची कसोटी कसाला लागता भाग्योदय झाला ॥ ६ ॥

संत भोजराजांचे प्रभावाने दिवा भीत अंधारात लपले ॥
शेवटी असंत संताला शरण आले मंबाजीचे तुकाराम झाले ॥७॥

# ८ द्या विठ्ठलाचा आकार

आम्ही भटजींना दाखवितो हात शेटजींची करितो साथ ॥
त्यामुळे उठल्या बसल्या जीवनांत बसते लाथ ॥ १ ॥

आम्ही भटजींना दाखवितो हात शेटजींची करितो साथ ॥
आप मरे तो मरे यजमानको लेके मरे जीवन होते बरबाद ॥ २ ॥

आम्ही भटजींना दाखवितो हात शेटजींची करितो साथ ॥
प्रकाशा नंतर अंधार सुकाळा नंतर दुष्काळ दुर्दैव करिते मात ॥ ३ ॥

आम्ही भटजींना दाखवितो हात शेटजींची करितो साथ ॥
त्यामुळेच समाज कंटकाकडोन फसविले जातो हातोहात ॥ ४ ॥

संत भोजराज वदति शेटजी म्हणजे राजस सरकार ॥
निर्लज्ज बेशरम सरकारला द्या विठ्ठलाचा आकार ॥ ५ ॥

# ९ आईसारखे दैवत नाही

आईसारखे दैंवत नाही म्हातारपणी ऐकत नाही ॥
बाप मला कळत नाही झाकली मूठ लाखाची पाही ॥ १ ॥

पत्नि सदा प्रीयच राहीं थंडी उन्हाचा ताप सोसवत नाही ॥
भगिनींचे सौख्य नाहीच नाही नेहमीच आजारी राही ॥ २ ॥

मुलांनी प्रेम केलेच नाही कमविले नाही हाच राग पाही ॥
मुलींचे लाभले सुख वाळवंटात थंड झराच राही ॥ ३ ॥

मित्रमंडळीं म्हणजे चालत्या गाईवरील गोमाशा पाही ॥
शीता भोवती भूते नाचती मजसमोर कुणी नाचलेच नाही ॥ ४ ॥

संत भोजराजांना जीवनी देवाचा विसर पडला नाही ॥
दुःख पहाता जवा एवढे सूख पर्वता एवढे हीच नवलाई ॥ ५ ॥



# १० जातियतेची करामत सारी

संत लिखाण लिहीतात रक्ताचे पाणी करुन ॥
भटजीचे साहित्य बापजाद्यांचें पोथीपूराणावरुन ॥१॥

संतांचे लिखाण रहातो अनुभव अनुभूतीचा वारसा ॥
भटजींचे लिखाण अनुवाद, वाद, विवाद वंश परंपरेचा ॥२॥

संतांचे साहित्य जनतेत जागृति सार अमृत पानाचा ॥
भटजीचे लिखाण विषमता, भांडण कार्बान वायू अपानाचा ॥३॥

संतांचे साहित्य गंगेचें पाणी जाते भगवंत चरणी ॥
भटजी लिखाण सदैव जागरुक शेटजी राज्य प्रचारकारणी ॥४॥

संत भोजराज वदति भटजी लिखाण थट्टा विनोद मस्करी ॥
राजपरंपरा, गुरुपरंपरा जातिचाच उदोउदो भारी ॥५॥

# ११ कसे ओळखावे

देवा ! शेटजी राज्यातील भटजी आम्ही कसे काय ओळखावे ।।
उडदा माजी काळे गोरे निवडणाराने कसे निवडावे ।।१।।

देवा ! शेटजी राज्यातील भटजी आम्ही कसे काय ओळखावे ।।
खडे वेचूनी जात्यामध्ये सर्वच सर्व भरडावे ।।२।।

देवा ! शेटजी राज्यातील भटजी आम्ही कसे काय ओळखावे ।।
एका माळचे मणी सारखे सर्वच दोऱ्यात ओवावे ।।३।।

देवा ! शेटजी राज्यातील भटजी आम्ही कसे काय ओळखावे ।।
राजकीय पक्षामध्ये होता दंगा पुढाऱ्यांना फाशी द्यावे ।।४।।

संत भोजराज वदति निधर्मी राज्यात धर्माला मान नाही ।।
श्रमीक सामान्य जनाला लुच्च्यांची नच कळली कारवाई ।।५।।

# १२ आमुचे जीवनात

आमुचे जीवनात आहे काय ? आम्ही चरित्र लिहावे ॥
आमुचा वेष साधा स्वभाव भोळा शिष्ठांना कसे रुचावे ॥१॥

आमुचे जीवनात आहे काय ? आम्ही चरित्र लिहावे ॥
न्यायासाठीच अज्ञातवास जीवन भकास म्हटले जावे ॥२॥

आमुचे जीवनात आहे काय ? आम्ही चरित्र लिहावे ॥
रात्रंदिवस काम काम शेवट पावेतो राम भजावे ॥३॥

आमुचे जीवनात आहे काय ? आम्ही चरित्र लिहावे ॥
थोरामोठ्यांकरितां वरवर सर्वांनीच धारेवर धरावे ॥४॥

संत भोजराजांना संत जनांतच संतपण लाभले ॥
कुणाला सहाय्य बिर्लांचे वशीला इंदिराजींचा देवाने केले भले ॥५॥

# १३ देवानेच केले भले

ओम् नमो भगवते वासुदेवाय देई मला सहाय्य ॥
तुजशिवाय देवा अंती नाहीच मला तरणोपाय ॥१॥

तूच मायबाप सखा अंधारांतील प्रकाश ॥
उठता बसता घेता नाव जीवन जगतो सावकाश ॥२॥

देवा ! झाली तव कृपा मनांला लाभली सुख शांती ॥
तुटला मोह मायेचा पाश नीघाली भूरळ भ्रांती ॥३॥

देवा ! तुझ्याच भक्तीने लाभली मला महान शक्ती ॥
शरिर बनले निरोगी सुचली युक्ती प्रयुक्ती ॥४॥

संत भोजराजांनी श्रीकृष्णालाच सर्वस्व अर्पिले ॥
देवाचेच गायचे गुणगान देवानेच केले भले ॥५॥

# १४ विठ्ठलाची परंपरा

ज्ञानदेवाने वाजवीता टाळी एकनाथाची आली पाळी ॥
नाथांची रंगता कथा संतांची भूक तहान हरली ॥१॥

ज्ञानदेवाने वाजविता टाळी नामदेवाची आली पाळी ॥
नामदेवाने करितां किर्तन देवांनी पुष्पवृष्टी केली ॥२॥

ज्ञानदेवाने वाजविता टाळी जनाईची आली पाळी ॥
जनाईने करितां प्रवचन श्रोत्यांची तृप्ती झाली ॥३॥

ज्ञानदेवाने वाजविता टाळी तुकारामाची आली पाळीं ॥
तुकाराम बनतां वनमाळी साथीला पेंद्या सांवतामाळी ॥४॥

संत भोजराज वदति भारती संतांची थोर परंपरा ॥
भजतां रुक्मा देवि वरा ज्ञानाने कळते. विठ्ठलंची आहे खरा ॥५॥

● ● ●

# १५ संत अमर जहाले

आम्ही भारतांचे प्रधानमंत्री सतत घोषणा करीत असतो ॥
बोलतो तसेच चालतो म्हणून निवडून येत असतो ॥१॥

गरिबांची गरिबी हटविण्यासाठीच प्रधान मंत्री बनतो ॥
भारतात पडला दुष्काळ संतांना मरू देत नसतो ॥२॥

आम्हीं भारतातील पुढारी निवडून येतांच राव राजे बनतो ॥
गाय आमुचीं राष्ट्र निशाणी गाईचा हंबरडा ऐकू येत नसतो ॥३॥

गाईचे देहात कोटी मानव गायीसाठींच श्री कृष्ण गुराखी बनती ॥
संत धर्मानेच वागती भारताचे कल्याणासाठीच जगती ॥४॥

संत भोजराज वदति दोन महामंत्रीं आमुचे देखत मेले ॥
जे मायेत शीरले ते वहावत वहात गेले. संत अमर जहाले ॥५॥

# १६ रामाला शरण जातात

मानवाच्या हृदयात रामरावण रामायण लिहीती वाल्मिकमुनी ॥
अयोध्येचा राम लंकेचा रावण दरबारी भाट गीत गाती दर-
बारातुनी ॥१॥

भारत हा श्रीमंत राजे लोकांचा पडतो प्रकाश अंधार राजांचा ॥
भारतात पंचावन्न कोटी संत राहतात गोड आवाज संतांचा ॥२॥

सात्विक वदावे संत राजस तामस मिश्रण असंतांचे ॥
आपण काय गायचे, वाचायचे जीवनसार पुत्र मानवाचें ॥३॥

प्रेमापेक्षा भक्ती थोर देवापेक्षा मंत्री चतुर वाद शिष्ठांचा ॥
सरळ सोपा मार्ग संताचा वाकडातिकडा भटजी पोरांचा ॥४॥

संत भोजराज वदति कावळे बगळे रावणाला भजतात ॥
राजहंस अमृत पितांना रामालाच कवटाळीतात ॥३॥

# १७ प्रतिभा आटली

भारतात संत साहित्त्याला वाव नाही कारण राज्य शेटजीचे ॥
असतांनी कसेही वागावे कौतूक अग्रलेख भटजींचे ॥१॥

साहित्त्यातील रामरावण युद्ध अहिनकूल वाद पूर्वापारचा ॥
रामाला वनवास सीतेला अज्ञातवास प्रभाव अज्ञानाचा ॥२॥

तुकारामानंतर भारतातील संतपरंपरा राजसांनीं संपविली ॥
संत कुणाला म्हणतात असंत चर्चा प्रभावी ठरली ॥३॥

भारत निधर्मी समजून संतांचे ताटांत टाकले मांसाचे तुकडे ॥
करकोचा कोल्ह्याचे जेवणाचा प्रचार साहित्त्य जिकडे तिकडे ॥४॥

संत भोजराज वदंति नका वाचू, रंभा, मेनका, बाईडर ब्रँडीची बाटली ॥
सत्ता, संपत्ती साठीच प्रचार करिती ज्यांची प्रतिभा आटली ॥५॥

# १८ धरले तर चावते

धरले तर चावते सोडले तर पळते जात नागाची ॥
मधूतिष्ठति जिव्हाग्रे हृदयेतू हलाहलम् वाणी राजस ठगांची ॥१॥

आयत्या बिळावरचे नागोबा जात असते बेरडांची ॥
मुखमे राम बगलमे सुरी बगळ्या संधी साधूंची ॥२॥

दगडात रहातो देव जाहिरात काळ्या रंगाचे मुक्ती धामची ॥
सत्ता संपत्तीचे पुजारी भाषा पूजा अर्चा चर्चा धर्माची ॥३॥

गरिबी हटवितो घोषणा रहाते राजकारणाची ॥
अन्यायाची करणी, पापाची भरणी दानत साहेबांची ॥४॥

संत भोजराज वदति बोले तैसा चाले वाणी संतांची ॥
रामनामानेच जगति तयांची कृति ईश्वर भक्तीची ॥५॥

# १९ दुखाःचा भार वाहिला

संत कांहीं लिहीतात असंतांना वाचायला वेळ नाही ॥१॥

संत काही बोलतात असंतांना ऐकायला सवड नाहीं ॥२॥

संत बोध करितात पाखडींना तत्वज्ञान पटत नाहीं ॥३॥

संत ज्ञानी असंतात विज्ञानी कधींच बोलत नाही ॥४॥

संत गरिबी जोवन जगतात श्रीमंतांना भूषण नाहीं ॥५॥

निधर्मापेक्षा धर्म श्रेष्ठ, संतधर्म अधर्मींना मान्य नाहीं ॥६॥

श्रमिकांचे बोलांचा अभाव पुढाऱ्यांचे बोलांना भाव राही ॥७॥

चकाकते ते सोने पदवीधरांचे अज्ञान ज्ञान म्हटले जाई ॥८॥

सापाला साप भेटे जातिय संघटणाच प्रभावी राही ॥९॥

विषयासाठी विषय प्रसिद्धीच आषय भोगा भोग पाही ॥१०॥

संत भोजराजांनी ज्ञान चक्षूने मानव जवळून पाहिला ॥
देव धर्माचा अभाव बघून दुखाःचाच भार वाहिला ॥११॥

# २० पांडुरंगाला जरुरत संतांची

संत भोजराज भारतीय संत लेखी पुरावाच राही ॥
साहित्य सम्राट हातचे कांकणाला आरशाची जरुरत नाही ॥१॥

शुद्ध चरित्र थोर चारित्र्य वृत्ति सात्विक पाही ॥
रात्रंदिवस लिखाण वाचन दुसरा उद्योगच नाही ॥२॥

धर्मासाठीच केला त्याग प्रभूसाठीच लाज धरली ॥
उठल्या बसल्या भजनाचा छंद काया विठोबालाच वरली ॥३॥

अशोक प्रकाशन पंचामृत विक्री साहित्य चर्चा गायन ॥
असंतांना नकोच प्रवचन हवे भटजींचे गीत रामायण ॥४॥

संत भोजराज वदति भारुड भरती तामसांची ॥
संत जातील तेथे अपमानची पांडुरंगाला आवड संतांची ॥५॥

# २१ आम्ही कोण ?

आम्ही कोण ? काळाची पाऊले मोजली आहेत झेंडा रोविला आहे॥
रानावनातुन जातांना विंचू, साप, काटे ठेचिले आहे ॥

आम्ही कोण? काळाची पाऊले मोजली आहेत झेंडा रोवीला आहे॥
असंत अभक्तांचे बोल कवडीमोल फुंकरने फुंकले आहेत ॥

आम्ही कोण? काळाची पाऊले मोजली आहेत झेंडा रोवीला आहे॥
पढत मूर्ख, ज्ञानांध, ढोंगी पदाधिकाऱ्याचा पराभव केला आहे ॥३॥

आम्ही कोण ? काळाचीं पाऊले मोजलीआहेत झेंडारोवीला आहे ॥
देव धर्मे ! ज्ञान हेंच कर्म ! जीवनात सुवर्ण कण वेंचला आहे ॥

संत भोजराजांचा अपमान गाढवांनी शारदा मंदिरात केला आहे ॥
रस्त्यातच भेटता ज्ञानदेव कडकडून मीठी मारली आहे ॥५॥

## २२ मी मित्र म्हणून

मी मित्र म्हणून सहज जातो डॉक्टरांचे घरीं ॥
लोक वदति ग्रहस्थाला आहे मोठी बीमारी ॥ १ ॥

मी मित्र म्हणून सहज जातो वकिलांचें घरीं ॥
लोक वदति हा चारशेवीस व्यापारी जोतो चर्चाकरी ॥ २ ॥

मी मित्र म्हणून सहज जातो आचार्यांच्या घरीं ॥
शिक्षीत वदति मुलांचे परिक्षेसाठीच हा पाणीं भरी ॥ ३ ॥

मी मित्र म्हणून सहज जातो राजकीय पुढाऱ्यांचे घरीं ॥
शिष्ट वदति तिकीटासाठीचं ही पाय धराधरी ॥ ४ ॥

संत भोजराज वदति राजसांचे रहाते सरकारी खोके ॥
कल्पनेचे कांदे बटांटे भरलेले तामसांचें सुपीक डोके ॥ ५ ॥

# २३ प्रयोगच फसला

आम्हाला स्थावर जंगम वैभवाचा नेहमी स्वाभिमान वाटतो ॥
भारतात सत्तेचे जोरावरच आम्ही संपत्ती वाढवित असतो ॥ १ ॥

असंतात प्रतिष्ठा लाभतां संतांची कुचेष्टा करित असतो ॥
राजकारांणात घेता भाग मी ! मी ! हाच वेद जयघोष असतो ॥२॥

पदाधिकार पदक पदवी लाभतां ! विभूति पूजाच करीतो ॥
पदक पदविच्या जोरावरच मायावी संतांचा अपमान करीतो ॥ ३ ॥

मी देशभक्त हरिभक्त अज्ञानी जनतेला दाखवित असतो ॥
पैसा, अन्न, विद्या आसुरी दानांतून गरिबांना फसवित असतो ॥ ४ ॥

संत भोजराजांना भारतात ज्ञानाचाच दुष्काळ भासला ॥
भारत देश स्वतंत्र झाला सरकारी प्रयोगच फसला ॥ ५ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 200280 दि:

## २४ बापूजी अमर है

माया कहे तो ठगनी सभिजन लेंते उसीका नाम ॥
मारने वाले मर गये संतोके मुखमे हरे राम ! हरे राम ! ॥१॥

चलतीका नाम गाडी गाडीमे है किसीका कौन ? ॥
पुलपरसे गाडी गीर गअि मुसाफिरको बचायेंगा कौन ॥ २॥

चलतीका का नाम गाडी जहाजमें है कीसीका कौन ? ॥
जब पानीको लगी आग तब पानीको बुझायेंगा कौन ॥ ३ ॥

चलतीका नाम गाडी दंगलमे है किसीका कौन ? ॥
अंदर बाहर गुंडे चोर ! पुलिस ! पुलिस ! पुकारा आयेगा कौन॥४॥

संत भोंजराज कहे हमेशा भक्कोको रहता आधार भगवान ॥
अमृतसागरमे डुब गअी नय्या बापूजी मर गअे यहि है अज्ञान ॥५॥

# २५ विठ्ठलच साक्षीदार

संतांनी लिहींली कथा जन्मा आली गाथा ॥१॥

संतांनी लिहीली कविता कवितेतून वहाते संत सरिता ॥२॥

संतांनी लिहीली कादंबरी कादंबरीची बनली श्वेतांबरी ॥३॥

संतांनी लिहीले नाटक असंतांना ताबडतोब झाली अटक ॥४॥

संतांनी लिहीला प्रबंध भवाचे तुटले तटातट बंद ॥५॥

संतांनी केलीं टीका संतांचे कपाळी शोभतो बुका ॥६॥

भारती संत भोजराजांचा झाला जयजयकार विठ्ठलच साक्षीदार॥७॥



# २६ विठ्ठलच उरला

देवा ! तुजवरच प्रीत गातो गीत दुपारी विठ्ठला धाव लवकरी ।।
तूच मायबाप सखा सोयरा हांक मारीता संकट निवारी ।।१।।

तुच करितो वृष्ठी, सजवीतो सृष्टी, देवांत महा श्रेंष्टी ।।
विश्व देखें वासुदेव संतावर तुझीच रहाते कृपांदृष्टी ।।२।।

माधवा, केशवा, चक्रधरा, अंती तुझी नीवड नीवडी ।।
बहूत सुकृताची जोडीं म्हणुनी विठ्ठला तुझीच आवडी ।।३।।

देवा! तूच मला निर्मीले लहानाचें मोठें केले जगीं मिरविले ।।
निवृत्ती ज्ञानदेव सोपान मुक्ताबाई तुकयानंतर संत बनविलें ।।४।।

संत भोजराजांचें आसनी शयनी विठ्ठल भरला ।।
देता घेंता संसार करितां जीवनी विठ्ठल पुरून उरला ।।५।।

# २७ विठ्ठल ! विठ्ठल ! चराचरी !

विठ्ठल! विठ्ठल! चरा चरी भारतात संपूर्ण भरला ॥
सतांचें हृदयात असतो आम्ही तो प्रत्यक्ष पाहिला ॥१॥

विठ्ठलाचें घेता नाम तुटतात विभूति पूजेचें पाश ॥
धरीता देवाची कास संतांना लाभते अमृत खास ॥२॥

विषमता. भेदाभेद, जातियता गळुनी जाते आपोआप ॥
मी! मी! माझे! माझें! सर्वांचा विसर नाहिसे होते पाप ॥३॥

भारतवासियांचेंवर प्रेम करिता नराचा होतो संत ॥
जीभेवर वसते सरस्वती लेखणीत गणपती बनतो पंत ॥४॥

संत भोजराजांना ज्ञानाने लाभली संतांची गादी ॥
पांडुरंगाच्याच कृपेने संसारात सौख्य आनंद आबादी ॥५॥

# २८ होते राजस तामस

मी चाळीस वर्षे ज्याचें सहवासात घालविली ते होते राजस तामस॥
धर्मी संत हे टाकावूच असंतांनी जवळ केले दरबारी कवि भास॥१॥

मी चाळीस वर्षे ज्यांना मोठे थोर म्हटले ते होते राजस तामस॥
अमृतापेक्षा ब्रँडीची बाटली एकच प्याला प्रिय हाच निज ध्यास॥२॥

मीं चाळीस वर्षे ज्यांना देशभक्त हरिभक्त मानले होते राजस तामस।
मोठे तेव्हढे खोटे कुंभाराचें लोटे बुडबुडे मृगजळाचाच भास॥३॥

मी चाळीस वर्षे ज्यांची जाहिरात ऐकली ते होते राजस तामस॥
शास्त्री, पंडित, बाबू काका, मामासाहेब, सरकारी चलन खास॥४॥

संत भोजराजांना लहानपणीच परमेश्वराचे दर्शन घडले ॥
भारत हा धर्मीचा, श्रमिक सात्त्विक संतांचे प्रचारक बनले॥५॥

# २९ अढळपद लाभले

संत भोजराज संत बनलें प्रथम संतांचे लक्षण जाणले ॥
निर्व्यसनातून संयम पाळतांना विठ्ठलाचे पाय धरिले ॥१

संत भोजराज संत बनले प्रथम संतांचे लक्षण जाणले ॥
खूप केला अभ्यास  निजध्यास  विठोबाचेच दर्शन घडले ॥२॥

संत भोजराज संत बनले प्रथम संतांचे लक्षण जाणले ॥
राजस तामस कावळे बगळे! भक्तांचेच जवळील अमृत प्याले॥३॥

संत भोजराज संत बनले प्रथम संतांचे लक्षण जाणले ॥
संसार केला नेटका नव्हता कधी फाटका जनतेला जागृत केले॥४॥

संत भोजराजांना मायावींनी सदा हिणवीले निंदीले ॥
संतांनी संतांना वंदीले प्रभूकृपेनेच जीवन शांत जगले ॥५॥

# ३० वाघ सिंह आहिंसक

वाघ सिंह अहिंसक असत।त हेच राजसांनी प्रचारीले ।।
श्रमिक सामान्यांची केली दिशाभूल दिवसा ढवळ्या नागविले।।१।।

वाघ सिंह अहिंसक असतात हेंच राजसांनी प्रचारिले ।।
कथा, किर्तन, प्रवचन धंद्यातून गाई बैलांना बुद्धिभ्रष्ट केले ।।२।।

वाघ सिंह अहिंसक असतात हेंच राजसांनी प्रचारीले ।।
कविता, कथा, संगीत नाटकातून पशू पक्षांचे डोळे दिपविले।।३।।

वाघ सिंह अहिंसक असतात हेंच राजसांनी प्रचारीले ।।
गरिबी हटवीतो वेद मंत्राने श्रमिकांना वाघाचे जवळ नेले ।।४।।

संत भोजराजांनी भारती वाघ सिंहांना धारेवर धरीले ।।
राजस तामसांची कोल्हेकुई संतजन टीकाकार बनले ।।५।।

● ● ●

# ३१ ज्ञानियांची नजर

ज्ञानियांची नजर रहाते सारखी सर्व मानवावरी ॥
आपुल्या सारीखे करिती तत्काळ पंढरीचे वारकरी ॥१॥

कष्टावर भारी श्रद्धा उत्पादन काढिती वरचेवरी ॥
पोटापुरते ठेवुनी वाटून देती गरिबांचे कैवारी ॥२॥

करुणेचे सागर, गुणांचे आगर भजती रुक्मादेवीवर ॥
जनसेवा, देशसेवा करितांना नेटका करिती संसार ॥३॥

राग, लोभ, मोह, ज्ञानाने जाळती प्रेम भक्तीचे पुजारी ॥
राजसांचें वर करिती मात सत्कार्याने ठरती विचारी ॥४॥

संत भोजराज ज्ञानियांचे राजे ठरले आजचे संत ॥
खेडोपाडी करिती भजन हेंच जीवन आहे पसंत ॥५॥



# ३२ वाघ गुरगुरला

संत वाघाचे गुहेत शीरले वाघ गुरगुरला होता ॥
नागाचे बीळाजवळ जाताच फुत्कार सोडला होता ॥१॥

नींबाचा पाला चघळतांच कडवट लागला होता ॥
कष्टाचे फळ मागता अपयशाचा वाटा मीळाला होता ॥२॥

कधी मधी डोंगर पोखरताच उंदीर पळाला होता ॥
दगडाशीं डोके लावीतांना कपाळाचा भाग सुजला होता ॥३॥

मुंबई नागपूरचा हॉल बघता बुणग्यांचा बाजार भरला होता ॥
गोविंद नको! गोपाळ नको! निधर्मी अधर्मीचा तमाशा होता ॥४॥

संत भोजराजांचा आवाज राजस तामसांनी बंद केला ॥
गाढव कावळे बगळ्यांचा गोंगाट संगीताचा भाग ठरला ॥५॥



# ३३ संतांना प्रसाद वाटला

आज येशवदेचा कान्हा गोकुळी खेळांत रंगला ॥
प्रेमाचा फुटता पान्हा हरि पोटभर दूध प्याला ॥१॥

आज राधिकेचा मोहन वृंदावनी धेनू चारायां गेला ॥
गायीने फोडता हंबरडा लगेच धांवूनी आला ॥२॥

आज अर्जूनाचा सारथी संग्रामी दिसेनासा झाला ॥
देवदत्ताचा ऐकता आवाज रथांत प्रकट झाला ॥३॥

आज उद्धव माधवाचे विरहाने ढसढसा रडला ॥
ज्ञानामृत लागता ओष्टाला लगेच आनंदला ॥४॥

संत भोजराजांनीं संतांमध्ये लपलेला हरी ओळखला ॥
मुरलीच्या मंजूळ नादातून प्रसाद संतांना वाटला ॥५॥

# ३४ अरींग मीरींग

अरींग मीरींग लवंगा तीरींग लवंगातींरचा डुबडुब बाजा ।।
आळंदीहुनी नीघाली पालखी ज्ञानेश्वरी वाचीतो संतांचा राजा।।१।

अरींग मीरींग लवंगा तीरींग लवंगातीरचा डुबडुब बाजा ।।
पैठणहून नीघालीं पालखी विठोबाला भेटतो एकनाथ राजा ।।२।।

अरींग मीरींग लवंगा तीरींग लवंगातीरचा डुबडुब बाजा! ।।
पंढरपुरात फिरते पालखीं किर्तन करीती नामदेव राजा ।।३।।

अरींग मीरींग लवंगा तीरींग लवंगातीरचा डुबडुब बाजा ।।
देहूहून नीघाली पालखी तुकयाचे स्वागत करितो विठोबा राजा ।।४।।

संत भोजराजांचा जन्म संत जनांचेच कामकाजा ।।
वारकऱ्यांना रस्त्यांत पाजीती उसाचा रस ताजा ताजा ।।५।।

# ३५ जनहो ! संत बना!

जन हो! संत असंतातील फरक ओळखा शेवटी संत बना ॥
देहाचा भोग, आत्म्याचा सोस असंतांची पोकळ वल्गना ॥१॥

राजस, तामसांचे सुंदर मिश्रण म्हणजे समजा असंत ॥
राजपक्ष, धर्मपंथ भेदाभेदच रहातो शिष्टांना पसंत ॥२॥

श्रमिक सामान्य पुरुषांनी रहावे संतांचे संगती ॥
कष्टावर श्रद्धा ठेवतांना नंतर बसावे अमृताचे पंगती ॥३॥

राजज्ञांना एकच उद्योग कुचेष्टा संतांची नच पारख प्रतिष्ठा ॥
रात्रंदिवस मुखांत राम संत राग लोभाला समजती विष्ठा ॥४॥

संत भोजराजांनी भारती संत. असंत फरक ओळखला ॥
भारत देश हा ज्ञानेश, एकनाथ, कबीराचा प्रचार केला ॥५॥

# ३६ आजचा मानव पुढारला

आजचा मानव पुढारला. सुधारला म्हणजे काय झाला? ॥
ज्याचे हातात ससा, तो पारधी ! हाच मंत्र गाऊ लागला ॥१॥

आजचा मानव पुढारला, सुधारला म्हणजे काय झाला ? ॥
विषमता, भाषाभेद. प्रांतभेद भेदीयांचा टीळा मस्तकी लागला॥२॥

आजचा मानव पुढारला सुधारला म्हणजे काय झाला ?
विज्ञानाचे रॅकेटने चंद्रावर गेला म्हणे वैकुंठ हादरवीला ॥३॥

आजचा मानव पुढारला सुधारला म्हणजे काय झाला ? ॥
विद्येचा शहाणपणा सत्तेच्या कोंदणात शोभला ॥४॥

संत भोजराज वदति आजचा मानव दीड शहाणा बनला ॥
अतिशहाण्यांचा गरिबांची चूक काढण्यात वेळ जाऊ लागला ॥५॥



# ३७ याद आअि न आयी

याद आअि ! न आअि ! मै तुम्हारेही गीत गाऊ ॥
कोई माने ! न माने ! आपके सामनेही झुक जाऊं ॥१॥

कोई समझे या न समझे मै धर्मका डंका बजाऊं ॥
तुम्हारा हमारा संगम ! यहि बनेगा अमृतका प्याऊं ॥२॥

सुख दुखके साथ बरसेंगी बरसात बुझेंगी प्यासियोंकी प्यास ॥
हे भगवान! जगतमे रामनाम रहेगा संतोके मुखमे राम सास॥३॥

विज्ञान अज्ञान फरक विज्ञानीं कहते यहि समझना ज्ञान ॥
राजस तामस सभी झुक जायेंगे जब माया घुमेंगी अस्मान ॥४॥

संत भोजराजकी न किसीको याद आअि न छाया छाई ॥
दिनरात सुभह शाम राम भजनमे सारी उमर गमाई ॥५॥



# ३८ पनघटको चली पानिहारी

पनघटको चलीं पनिहारीं जिसकी दुनिया सबसे न्यारी ॥
घट भुल गई घरको कहती चले आवो मूकुंद मुरारी ॥१॥

पनघटको चली पनिहारी जिसकी दुनिया सबसे न्यारी ॥
यमुनाके नीर तीर घटमे देखतर पुकारती मींल गये श्रीहरी ॥२॥

पनघटको चली पनिहारी जिसकी दुनिया सबसे न्यारी ॥
घड शीरपर हात कमरपर गीत गाकर नाचरही मोहन प्यारी॥३॥

पनघटको चली पनिहारी जिसकी दुनिया सबसे न्यारी ॥
सखीयोंके पास जाकर कहती कन्हैयाको मीलके वापस
आतीं गोरी ॥४॥

संत भोजराजने यमुनाके घाटपर देखी मोहनकी छबी न्यारी ॥
घट छोड दिया पानीमे कहते चलो घर गोवर्धन गिरी धारी ॥५॥

# ३९ जिवनाचा बाजार

जगांत कष्ट करणाराला, ईमानदाराला मुळींच किमत नाहीं ॥
उठल्या बसल्या हरिहरि करणारा फजीतच होई ॥ १ ॥

प्रत्येकाचे मनांत ठसतो नरम, गरम, बेशरमपणा ॥
एका बोटावरची थुंकी त्या बोटावर करणें हाच मानभावीपणा ।२

गोड गोड शद्बांतून राजस करितात लोभाची पेरणी ॥
स्वार्थ परमार्थातून तामस भरतात पापाची बरणी ॥ ३ ॥

चारशेवीसपणा, विश्वासघात ठरते आधुनिक कला ॥
सरळपणाचे मस्तकी टंचाई जीवनांत अवकळा ॥ ४ ॥

संत भोजराज वदति घरां घरांत शीरले मायावी सरकार ॥
देवांवरील श्रद्धे पेक्षां राजकारण बनले जीवनाचे सार ॥ ५ ॥

# ४० प्रभूके साथ चले

चलो ! चलो! तुम आगे चलों ! चलते चलते गंगापार चलो ॥
हम आगे तुम पिछे म्त बोलो ! सभिमिलके साथ चलो ॥ १ ॥

चलो ! चलो ! तुम आगे चलो ! चलते चलते गंगापार चलो ॥
साथ आये साथ चलो बहती है गंगा नय्यामे बैठके चलो ॥ २ ॥

चलो ! चलो ! तुम आगे चलो ! चलते चलते गंगापार चलो ॥
न रहा भेद ! न रहा खेद ! आगे बढते बढते चलो ॥ ३ ॥

चलो ! चलो ! तुम आगे चलो ! चलने चलते गंगापार चलो ॥
जो कुछ बोलना सोचके बोलो ! प्रेमका गीत गाते चलो ॥ ४ ॥

संत भोजराज न रहें आगे पिछे ! आय अकेले जाय अकेले ॥
देखे जिंदगीके मेंले प्रेंमसे आखमिचौली खेले ! आखरी प्रभूके
साथ चले ॥ ५ ॥

# ४१ प्रभू भजनांतच दंगले!

प्रभाती उठोनि राम भजावा रामःकारणी देह झिजवावा ॥
नित्य नियमीत पोटाचा उद्योग करावा सत्कार्यांत वेळ घालवावा ।१।

आहार निद्रा आराम प्रत्येकांत नियमीतपणा धरावा ॥
उठल्या बसल्या संत संग चिंतन मननांत वेळ घालवावा ॥ २ ॥

काय वाचावे ! काय लिहावे ! सारा संयमनाचा भाग ठरावा ॥
संत साहित्त्य संतपरंपरा जीवनाचा मार्ग आक्रमावा ॥ ३ ॥

संसारात असुनी संसारातुनी काढिता पाय घ्यावा ॥
घर आपुले मंदीर शांती सौख्य आनंद धाम वदावा ॥ ४ ॥

संत भोजराजांचे जीवन लहानपणांपासून नियमित बनले ॥
संत संगतीने देहाला लागले वळण प्रभूभजनांतच दंगले ॥५ ॥



# ४२ देहांला लोळवा !

चंचल मन धांवते देवा ! वारुच्या वेगाने ॥
तव नामाचा घालता लगाम जाते योग्य त्या मार्गाने ॥ १॥

भोगीचा देह चालतो जिभेच्यां रस सेवनाने ॥
पोसला जातो पिंड विषय, काम वासनेने ॥ २ ॥

मी ! मी ! माझे ! माझे ! हाच वेद गायला जातो गर्वाने ॥
सत्कार, हींच देशभक्ती अभक्त मीरवीला जातो मोटारीने ॥३॥

विज्ञान, अज्ञान मिश्रण विकले जाते बाजार भावाने ॥
आप मरे तो मरे दुनियाको लेके मरे ! वहाती महापुराने ॥४॥

संत भोजराज वदति हरि भजनांतच वेळ घालवा ॥
संतांचा मार्ग प्रकाशाचा भवतीमध्येंच देहाला लोळवा ॥ ५ ॥

***

# ४३ दाह शांत झाला

कारल्याची भाजी कडवट लागली नवलाई कसली ॥
शेवग्याची भाजी कडवट लागली चूकच झाली ॥ १ ॥

अनवाणी पायांत काटा मोडला कुचराई कसली ॥
काटयाचा नायटा झाला दुःख भोगायची पाळी आली ॥ २ ॥

कुत्री आंगावर येतात तरीच हातात काठी घेतली ॥
कावरलेला कुत्रा चावला इंजेंक्शनची पाळी आली ॥ ३ ॥

अंधारात विंचू डसला सावधानतेचा कळस झाला ॥
केळाचे सालटावरून पाय घसरला पायच मोडला ॥ ४ ॥

संत भोजराज वदति संतांना राजसांनी उगीच त्रास दिला ॥
तामसांचे अपमानाने ताप आला प्रभू भजनाने दाहशांत झाला ।५।

# ४४ निराश कां होता ?

चार भिंतीच्या खोलींत जो खुर्चीवर ताठ झाला ॥
संत येता घरां वेड्याला वेडाचा झटका आला ॥ १ ॥

आम्ही पदाधिकारी, पदवीधर हाच तोंडाला दारुचा प्याला ॥
विज्ञान, अज्ञानाचे, करुनी मिश्रण पाजीतो दारु संताला ॥ २ ॥

विद्येनेच मनुष्याला मिळतो मान सत्ता प्रसिद्धी संपत्ती ॥
राजसाची नीतीच मूलखा वेगळी कांठोकाठ भरली अधोगती॥३॥

परमेश्वर भक्ताला जेंथे नाही मान समजावे मह्‌ा विद्यालय ॥
ठगास महाठग हेंच राजकारण आधूनिक प्रचार कार्यालय ॥ ४ ॥

संत भोजराज वदति आवडींने भावे हरिनाम घेता ॥
दुष्टांनी केला अपमान संतांनो निराश कां होता ॥ ५ ॥

# ४५ भगवंतच उभा राही !

चला ! चला ! हरि मंदीरात जाऊं ॥
प्रेम भाव भक्तीने हरिचेच गुण गाऊं ॥ १ ॥

टाळ, मृदुंग वीणेचा सूर लावूं ॥
माधवा ! विठ्ठला ! केशवा ! हाच मंत्र गाऊं ॥ २ ॥

विषमता, भेदा भेद कृतीनेच घालवूं ॥
निरंहकार कपाळी चंदन, बुका लावूं ॥ ३ ॥

ज्ञानमय, ज्योतिर्मय अंतरी प्रभूला आळवूं
भक्ताला देवाचाच आधार अज्ञान तम घालवूं ॥ ४ ॥

संत भोजराज वदति भजना सारखे सूख नाहीं ॥
प्रेम भक्तीने प्रत्यक्ष्य भगवंतच उभा राही ॥ ५ ॥



# ४६ देव कळला नाही

संता ! आवडीने भावे तूं हरिनाम घेसी ॥
हरिला साक्ष ठेवूनच अहोरात्र कार्य करीसीं ॥ १ ॥

कर्मातच तुझा असतो भाग फळांत नसतों कधीं ।
खेद करितो कशाचा तुझेच जपाला परमावधी ॥ २ ॥

सकळ जीवांचा जो करी सांभाळ ! भक्ता कसा विसरेल ॥
संतांचे जीवन अमृताचें पान ! लागतोच काळवेळ ॥ ३ ॥

श्रीमंतापेक्षा संत बनणे भारती आहेच हो कठीण ॥
कष्टमय जीवन जगतांना संतांचे हाती सतीचे वाण ॥४ ॥

संत भोजराज वदति संतांची पारख असंतांना नाहीं ॥
ज्यानें संत ओळखला नाहीं त्याला देव कळला नाहीं ॥ ५ ॥

# ४७ साहेब म्हटल्यावर !

साहेब म्हटल्यावर कुत्रा पाळण्याचा शौक भारी ॥
कुणी सभ्य साधू संत भिकारी येऊ नये घरीं दारी ॥ १ ॥

साहेबांचा गोडस कुत्रा म्हटल्यावर प्रत्यकाने घाबरावें ॥
साहेबांचा जाच थोडा ! कुत्र्याचाच त्रास सोसावे ॥ २ ॥

साहेबाला एकच काम ! पापाने घडे भरावें ॥
कुत्रा भुंकताच गरिबाला चावताच ! कुत्र्याला गोंजारावे ॥ ३ ॥

भारती दचक, वचक, दरारा ह्याचाच पूर वहावें ॥
धर्मापेक्षा निधर्म, गूणापेक्षा अवगुणाचें, प्रदर्शन भरवावे ॥ ४ ॥

संत भोजराज वदति दुर्जनाला सर्वांनी कायद्याने वंदावे ॥
साहेबाचें कुत्र्याचा प्रभाव शासनाचाच भाग ठरावे ॥ ५ ॥

● ● ●

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२००४०
शाखा

# ४८ प्रयोग छान !

देवा ! चार प्रकारचा तुझा अवतार मी प्रत्यक्ष पाहिला ॥
चार प्रकारचें भक्त असतात त्यांतील ज्ञानी मी ओळखला ॥ १ ॥

देवा ! सगुण निर्गुणांतील तुझी हालचाल मी भूतांत पाहिली ॥
विज्ञान, अज्ञान फरक कळतांच काया तुलाच वाहिलीं ॥ २ ॥

राजस तामसांचा बघतां कारभार संतांचेच पाय धरीले ॥
असंत अभक्तांचे प्रहार मी हंसत खेळत वार झेलले ॥३॥

देवा ! संतांची निंदा, कुचेष्टा करीत मायावी हरि भक्त बनले ॥
स्वार्थ परमार्थ साधतांना वैभवानेच डोळे दिपविले ॥ ४ ॥

सत भोजराज वदति निधर्मी राज्यात धर्माला नच मान ॥
चार भिंती मधील खुर्चीवरच जादूचा करिती प्रयोग छान ॥ ५ ॥



# ४९ राजस वदा कडू कारले

संत नेहमीच चालतात ज्ञानमय प्रकाशमय मार्गाने ॥
असंतांना वाकडा, तिकडा मार्गपसंत जगती वाम मार्गाने ॥ १ ॥

संत नेहमीच सगुण, निर्गुणा भोवती नाचतात ॥
असंत शिता भोंवती नाचतांना विभूती पूजतात ॥ २ ॥

संत " हेचि दान देगा देवा ! तूं जवळ रहावा " गीत गातात ॥
अभक्त, संताची निंदा कुचेष्टा करणे पसंत करितात ॥ ३ ॥

संत जगाच्या कल्याणासाठीच देह झिजवीतात ॥
असंत सत्तेच्या जोरावरच श्रमिकांना गुलाम करितात ॥ ४ ॥

संत भोजराजांना असंतांनीं घरातच छळीले ॥
झाले गेले गंगेला मिळाले राजसांना वदावे कडू कारलें ॥ ५ ॥

★ ★

# ५० जाहीर करावा

जे कां रंजले गांजले त्यासी म्हणे जो आपुले ! तोची संत जाणावा ॥
बोलाचाच भात बोलाचीच कढी खाऊ घालीतो तो असंत वदावा ।१।

जे कां रंजले गांजले त्यासी म्हणे जों आपुले ! तोची संत जाणावा ॥
ह्या बोटावरील थुंकी त्या बोटावर झेलतो भटजी कावा वदावा ।२।

जे कां रंजले गांजले त्यासी म्हणे जो आपुले ! तोची संत जाणावा
गरिबी हटविणे नाव गरिबांना हटविणे डाव ! तोचि शेटजी
म्हणावा ॥ ३ ॥

जे कां रंजले गांजले त्यासी म्हणे जो आपुले ! तोची संत जाणावा ।
शेटजी भटजींचे वर्तमान पत्रातील वाघ, सिंह क्रूर ठरवावा ॥ ४॥

संत भोंजराज वदति राजसांचा प्रचार हाणून पाडावा ॥
तामस समजा रावणाचे वंशज दुष्टांचा कावा जाहीर करावा ॥५॥

# ५१ टंचाई

दुष्काळाला टंचाई म्हणतांच ! एक शाद्बिक फायदा झाला ॥
मराठी भाषेत पडली भर बोलाचाच भात वाढला गेला ॥ १ ॥

दुष्काळाला टंचाई म्हणताच ! एक शाद्बिक फायदा झाला ॥
संताची आई मरतांच पुतनेचा नंगानाच सुरुं झाला ॥ २ ॥

दुष्काळाला टंचाई म्हणतांच ! एक शाद्बिक फायदा झाला ॥
राम वनवासाला जातांच रावण गादीवर बैसला ॥ ३ ॥

दुष्काळाला टंचाई म्हणताच ! एक शाद्बिक फायदा झाला ॥
फायदा तोटयातील फरक हाच सरकारी कायदा झाला ॥ ४ ॥

संत भोजराज वदति दुष्काळांतच संत असंत फरक कळला ॥
असंता पेक्षा संत बरा ! रावण नव्हे रामखरा ! जो तो देव भजू
लागला ॥ ५ ॥

# ५२ संतांची कृपा झाली

संताचीच कृपा झाली ॥
साहित्य इमारत फळा आली ॥ १ ॥

ज्ञानदेवे रचिला पाया ॥
रचियेले संतांचे देवालया ॥ २ ॥

नामा तयाचा किंकर ॥
तेथे केला साहित्य विस्तार ॥ ३ ॥

जनार्दन स्वामीचा एकनाथ ॥
ध्वज उभारीला भागवत ॥ ४ ॥

संत साहित्य वाचा सावकाश ॥
तुका झाला देऊळाचा कळस ॥ ५ ॥

संत भोजराज वदा संतांचा दास ॥
काढिता मायेचा पाश गेला भ्रम निरास ॥ ६ ॥

***

# ५३ धर्म

धर्मच जीवाचा सांगाती ॥
धर्मानेच होते जन जागृति ॥ १ ॥

धर्मच जीवनाचे सार ॥
सूख मिळते अपरंपार ॥ २ ॥

धर्मच अंती तरणोपाय ॥
शांतीचा एकमेव उपाय ॥ ३ ॥

धर्मच ज्ञानमय, प्रकाशमय ॥
साधकाची जन्मदात्री माय ॥ ४ ॥

संत भोजराजांनी देव, धर्म ओळखला ॥
धर्मातूनच सुखाचा मार्ग शोधीला ॥ ५॥



# ५४ गोकुळीचा कृष्ण

आज गोकुळीचा कृष्ण वृंदावनी एकटाच पावा वाजवीत होता ॥
मथुरेला कंसाचा वाढदिवस साजरा अभक्तांचा मेळा जमला होता ।१।

आज गोकुळीचा कृष्ण वृंदावनीं एकटाच पावा वाजवीत होता ॥
राधिकेचे कथक, नागनृत्य बघण्या दरबारात थाट माट होता ।२।

आज गोकुळीचा कृष्ण वृंदावनी एकटाच पावा वाजवीत होता ॥
उद्धव वेदाचा वाद घालण्या कौरव नगरी गेला होता ॥ ३ ॥

आज गोकुळींचा कृष्ण वृंदावनी एकटाच पावा वाजवीत होता ॥
विदूर प्रवचनासाठी शिशूपालाचे घरीं गेला होता ॥ ४ ॥

आज गोकुळीचा कृष्ण वृंदावनी एकटाच पावा वाजवीत होता ॥
चैन, भोग, ऐष, आराम गवळयांचे हाती मदिरेचा प्याला होता ।५।

आज गोकुळीचा कृष्ण वृंदावनी एकटाच पावा वाजवीत होता ॥
भटजी, शेटजीचे मैफलीत राग संतावरच दिसत होता ॥ ६ ॥

संत भोजराज वदति कंसाचा वाढदिवस मरणापावेतो होता ॥
संत हाचि देव मुरलीचा स्वर संतांचे हृदयांत कायम होता ॥७॥

# ५५ कृपा झाली

देवाचीच संतावर कृपा झाली ॥
साहित्य गंगा वेगे वाहू लागली ॥ १ ॥

ज्ञानदेव बनला ज्ञानाचा सागर ॥
सर्वच संत तया जोडीती कर ॥ २ ॥

नामदेव बनला गंगा धरण ॥
संताचे चुकवी जन्म मरण ॥ ३ ॥

जनाई बनली गंगेचा पाट ॥
संतांना दाखविली पंढरीची वाट ॥ ४ ॥

एकनाथ बनले पाण्याची टाकी ॥
घरा घरात भरली ज्ञानाची डोकी ॥ ५ ॥

तुकाराम शेवटी नळाची तोटी ॥
संत ज्ञानाचीच भारती कसोटी ॥ ६ ॥

संत भोजराज ओटाला लागला प्याला ॥
तीर्थ प्रसादाने भक्त नाचू लागला ॥ ७ ॥

# ५६ देवाचे बोलावणें

आले ! आले ! देवाचे बोलावणे आनंदे आमंत्रण स्वीकारणें ।।
आतां नकोच निंदा कुचेष्टा ! सोडणें प्रतिष्ठा व मीरवीणे ।।१।।

सखे, सोयरे, ईष्ट, मित्र हळू हळू सर्वांना मुकणे ।।
दैवी संपत्तीचाच उपयोग सुख शांतीचे जीवन जगणें ।। २ ।।

काय कमवायचे किती गमवायचे नकोच कीत फाडणें ।।
नव्हतांच मनांला ताप एकच अनुताप स्वतःला विसरणें ।। ३ ।।

देणे नव्हते कुणाचे घेणे पण नव्हते कुणाकडे ।।
मीं ! मी ! माझे ! माझे ! कशाला हवे संकट, सांकडे ।। ४ ।।

संत भोजराज जलबिंदू बनली नदी ज्ञानाचें सागर ।।
विठू रायाचेच चाकर संतांचेच आहेत माहेर घर ।। ५ ।।



# ५७ ज्ञानदेव तुकारामाचा

मी पूर्वि होतो पददलीत अभ्यासाने गेलो पुढे पुढे ॥
देवाचा पडता विसर मोटार चालली व्यासपीठाकडे ॥ १ ॥

मी पूर्वि होतो श्रमिक साहसाने बनलो श्रेष्टी श्रीमंत ॥
साहित्य संमेलनाचा अध्यक्ष्य म्हणून राजसांना पसंत ॥ २ ॥

मी पूर्वि होतो देवभोळा आता बनलो महान पुढारी ॥
सहकारी संस्थांचा बनतां कारभारी देवपण माझी वर वर करी ॥३॥

मी पूर्वि होतो अबोल आतां झालो पुढारी वकील ॥
नशिबाने होता मिनीष्टर माझेच बोल ठरती अनमोल ॥ ४ ॥

संत भोजराज वदति चळवळीने नराचें हाती येते सोने ॥
सोन्या पेक्षा परिस श्रेष्ठ संतांचा विसर पडतो अज्ञानाने ॥ ५ ॥

# ५८ साहित्य सम्राट

आम्ही बनलो साहित्त्य सम्राट काय वर्णावी बहादुरी ॥
जो भेटे तो गुरु घाली नाकात वेसण हाती घेतो दोरी ॥ १ ॥

आम्ही बनलो संत ध्येय आमुचे बघायचे अनंत ॥
जनतेला नव्हता खेद खंत सर्वांना राजस, तामस पसंत ॥ २॥

आम्ही एकदा साहित्त्य संमेलन केले जवळी ॥
अध्यक्ष्य स्वागताध्यक्षांचे भाषाणाचे बनलो बळी ॥ ३ ॥

जुने ते सोने, मेरे मुरगीकी एक टांग, हाच होता अट्टाहास ॥
देव नको ! धर्म नकों ! गरिब नको ! संताबद्दल उपहास ॥४॥

संत भोजराज वदति संत साहित्त्याचीच कसोटी ॥
भट्टींत टाकलां सोने पितळ, तांबे, चांदी जाते मसनवटी ॥ ५ ॥

# ५९ किंचीत् कवि

शद्बांचा पिकतामळा कवि ट ला ट जोडीतो फिट्ट ॥
माईक जवळ येतां पाईक कवितेला कवि पकडतो घट्ट ॥ १ ॥

मागे प्राचार्य समोर आचार्य उजवी कडे मुले डावीकडे मुलीं ॥
कुणी तरी वाजवा हो टाळी ! माझी सात मासी कविता
गर्भातच मेली ॥ २ ॥

आमुचे गुरुनें आम्हां शिकविले वीरा ! तूं मुलीवर कविता कर ॥
अर्ध्या हळकुंडात हो नोवरदेव ! तूं पुरूष तुला कसला डर ॥३॥

ओष्ट शलाका ! बुढ्ढीचे बाल ! आतांचे कवितेचे रहाते नांव ॥
गळा आहे पण आवाज नाहीं· कवि रेतींतून ओढितो नाव ॥ ४ ।

संत भोजराज वदति आधुनिक कविनां संबोधती किंचीत् कवि ॥
लग्न लागतांच कवि घरातच फिरतो जणू पृथ्वी भोवतीं रवि ।५।



## ६० खुद पसंत

सात्विक, राजस, तामस फरक पदवीधरांना कळत नाही ॥
वाचायचें असते मरायचे नसतें टींकेचा अर्थ समजत नाही ॥१॥

ज्ञान म्हणजे विज्ञान आणि अज्ञान करिती सुंदर मिश्रण ॥
संत ज्ञानी असतात नच कळल्यान शेवटी ओढवतं मरण ॥ २ ॥

धर्म राजकारण सांगड धर्म नको ! निधर्मीचीच आवड ॥
देह आत्मा फरक नच जाणीव विषय भोगाचीच निवड ॥ ३ ॥

मी शहाण्याचा कांदा देहांत मनांत नित्य दुरःभिमान ॥
संतांची कुचेष्टा स्वतःची प्रतिष्ठा हाच राही स्वाभिमान ॥ ४ ॥

संत भोजराज वदति श्रमिक सामान्यात असती संत ॥
न जाणे न येणे अशा पामराला ! वदतात खुदपसंत ॥ ५ ॥



# ५७ ज्ञानदेव तुकारामाचा

मी पूर्वि होतो पददलीत अभ्यासाने गेलो पुढे पुढे ॥
देवाचा पडता विसर मोटार चालली व्यासपीठाकडे ॥ १ ॥

मी पूर्वि होतो श्रमिक साहसाने बनलो श्रेष्टी श्रीमंत ॥
साहित्य संमेलनाचा अध्यक्ष्य म्हणून राजसांना पसंत ॥ २ ॥

मी पूर्वि होतो देवभोळा आता बनलो महान पुढारी ॥
सहकारी संस्थांचा बनतां कारभारी देवपण माझी वर वर करी ।३।

मी पूर्वि होतो अबोल आतां झालो पुढारी वकील ॥
नशिबाने होता मिनीष्टर माझेच बोल ठरती अनमोल ॥ ४ ॥

संत भोजराज वदति चळवळीने नराचें हाती येते सोने ॥
सोन्या पेक्षा परिस श्रेष्ठ संतांचा विसर पडतो अज्ञानाने ॥ ५ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वाक्षर
अनुक्रम २००४० दि: ४/१२/०४
क्र. ३१८) नोंद दि. २३/१०/१९

# ५८ साहित्य सम्राट

आम्ही बनलो साहित्त्य सम्राट काय वर्णावी बहादुरी ॥
जो भेटे तो गुरु घाली नाकात वेसण हाती घेतो दोरी ॥ १ ॥

आम्ही बनलो संत ध्येय आमुचे वघायचे अनंत ॥
जनतेला नव्हता खेद खंत सर्वांना राजस, तामस पसंत ॥ २॥

आम्ही एकदा साहित्त्य संमेलन केले जवळी ॥
अध्यक्ष्य स्वागताध्यक्षांचे भाषाणाचे बनलो बळी ॥ ३ ॥

जुने ते सोने, मेरे मुरगीकी एक टांग, हाच होता अट्टाहास ॥
देव नको ! धर्म नको ! गरिब नको ! संताबद्दल उपहास ॥४॥

संत भोजराज वदति संत साहित्त्याचीच कसोटी ॥
भट्टींत टाकतां सोने पितळ, तांबे, चांदी जाते मसनवटी ॥ ५ ॥

# ५९ किंचीत् कवि

शद्बांचा पिकतामळा कवि ट ला ट जोडीतो फिट्ट ॥
माईक जवळ येतां पाईक कवितेला कवि पकडतो घट्ट ॥ १ ॥

मागे प्राचार्य समोर आचार्य उजवी कडे मुले डावीकडे मुलीं ॥
कुणी तरी वाजवा हो टाळी ! माझी सात मासी कविता
गर्भातच मेली ॥ २ ॥

आमुचे गुरुनें आम्हां शिकविले वीरा ! तूं मुलीवर कविता कर ॥
अर्ध्या हळकुंडात हो नोवरदेव ! तूं पुरूष तुला कसला डर ॥३॥

ओष्ट शलाका ! बुद्धीचे बाल ! आतांचे कवितेचे रहाते नांव ॥
गळा आहे पण आवाज नाहीं· कवि रेतींतून ओढितो नाव ॥ ४ ।

संत भोजराज वदति आधुनिक कविंनां संबोधती किंचीत् कवि ॥
लग्न लागतांच कवि घरातच फिरतो जणू पृथ्वी भोवतीं रवि ।५।



# ६० खुद पसंत

सात्विक, राजस, तामस फरक पदवीधरांना कळत नाही ॥
वाचायचें असते मरायचे नसतें टीकेचा अर्थ समजत नाही ॥१॥

ज्ञान म्हणजे विज्ञान आणि अज्ञान करिती सुंदर मिश्रण ॥
संत ज्ञानी असतात नच कळल्यान शेवटी ओढवतं मरण ॥ २ ॥

धर्म राजकारण सांगड धर्म नको ! निधर्माचीच आवड ॥
देह आत्मा फरक नच जाणीव विषय भोगाचीच निवड ॥ ३ ॥

मी शहाण्याचा कांदा देहांत मनांत नित्य दुराभिमान ॥
संतांची कुचेष्टा स्वतःची प्रतिष्ठा हाच राही स्वाभिमान ॥ ४ ॥

संत भोजराज वदति श्रमिक सामान्यात असती संत ॥
न जाणे न येणे अशा पामराला ! वदतात खुदपसंत ॥ ५ ॥

REFBK-0020047
REFBK-0020047
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
प्र. क्र. २००४८